
मनीमाऊबद्दलच्या Fun Facts! ५



पॉवरपफ गर्ल्स ९



# सकाळ

छोटा पॅकेट बडा धमाका... १२



NIE Website

अंकासाठी संपर्क 98815 98815

पुणे, शुक्रवार, ९ मे २०२५ ■ पाने १२ किंमत ₹ ६

NIE NEWSPAPER IN EDUCATION

**बुधवारी मध्यरात्री भारतीय लष्कराने पाकिस्तानमध्ये असलेल्या ९ दहशतवादी तळांवर हवाई हल्ले करून हे तळ पूर्णपणे उद्ध्वस्त केले. सगळीकडे भारताच्या या धाडसी 'ऑपरेशन सिंदूर' कारवाईची चर्चा सुरू आहे. भारताने कुठे-कुठे कारवाई केली, त्यासाठी कोणते तंत्र वापरले, याविषयी आज आपण थोडे जाणून घेऊ.**




# 'सिंदूर'ची शौर्यगाथा!

## तळ कसे निवडले?

भारताची गुप्तचर यंत्रणा पाकिस्तानातील दहशतवाद्यांवर लक्ष ठेवून होती. गुप्तचर विभागाने आणलेल्या विश्वासू माहितीच्या आधारे दहशतवाद्यांचे तळ निश्चित केले गेले आणि ते उद्ध्वस्त करण्याची योजना आखण्यात आली. या हवाई हल्ल्यांमध्ये भारताने पाकिस्तानच्या सैन्याला आणि पाकिस्तानी नागरिकांना लक्ष्य केले नाही.

## कोणकोणते तळ उडवले?

### पाकव्याप्त काश्मीरमधील तळ

**सवाईनाला तळ** (मुझफ्फराबाद)

पाकव्याप्त काश्मीरच्या ताबारेषेपासून (म्हणजे 'लाइन ऑफ कंट्रोल'पासून) हा तळ ३० किलोमीटर दूर होता. हे 'लष्करे तैय्यबा'च्या दहशतवाद्यांना प्रशिक्षण देण्याचे केंद्र होते. **सोनमर्ग (२० ऑक्टोबर २०२४), गुलमर्ग (२४ ऑक्टोबर २०२४), पहलगाम (२२ एप्रिल २०२५) या ठिकाणी जे दहशतवादी हल्ले झाले होते, त्यातील दहशतवाद्यांनी इथून प्रशिक्षण घेतले होते.**

**सय्यदना बिलाल तळ** (मुझफ्फराबाद)

हे 'जैश ए मोहम्मद' या दशतवादी संघटनेचे केंद्र होते. **दहशतवाद्यांना हत्यारे, स्फोटके आणि जंगलात कसे तग धरून राहावे, याबद्दलचे प्रशिक्षण (जंगल सर्व्हायव्हल ट्रेनिंग) इथे दिले जात होते.**

**गुलपुर तळ** (कोटली)

हा तळ भारत-पाकिस्तान ताबारेषेपासून ३० किलोमीटर दूर होता. 'लष्करे तैय्यबा' या दहशतवादी संघटनेचे हे केंद्र होते. रजौरी व पूँछ भागात त्यांनी दहशतवादी कारवाया केल्या होत्या. **२० एप्रिल २०२३ रोजी पूँछमध्ये तसेच ९ जून २०२४ रोजी झालेल्या दशतवादी हल्ल्यांमधील दहशतवाद्यांनी इथून प्रशिक्षण घेतले होते.**

**बरनाला तळ** (भीमबर)

हा तळ भारत-पाकिस्तान ताबारेषेपासून **९ किलोमीटर दूर होता. हेही दहशतवाद्यांचे प्रशिक्षण केंद्र होते.**

**अब्बास तळ** (कोटली)

हा तळ भारत-पाकिस्तान ताबारेषेपासून **१३ किलोमीटर दूर होता. इथे एका वेळी १५ दहशतवाद्यांना प्रशिक्षण दिले जात होते.**

## विशेष तंत्राचा वापर

भारताने दहशतवादी तळांवर हवाई हल्ले करण्यासाठी विविध 'प्रिसिजन स्ट्राइक' शस्त्रास्त्रे वापरली. त्यामुळे नेमक्या आणि ठरावीक इमारतींवर आपल्याला हल्ला करता आला.



### पाकिस्तानातील तळ

**सर्जल तळ** (सियालकोट)

आंतरराष्ट्रीय सीमेपासून हे केंद्र ६ किलोमीटरवर आहे. **मार्च २०२५ मध्ये ४ जम्मू-काश्मीर पोलिसांवर हल्ला करणाऱ्या दहशतवाद्यांना इथे प्रशिक्षण मिळाले होते.**

**महमूना जोया तळ** (सियालकोट)

आंतरराष्ट्रीय सीमेपासून हे केंद्र १२ ते १८ किलोमीटरवर आहे. 'हिजबुल मुजाहिदीन' या दहशतवादी संघटनेचा हा मोठा तळ होता. जम्मूतील कथुआ भागात दहशतवाद पसरवण्याचे काम इथून नियंत्रित केले जात होते. **पठाणकोट हवाई तळावर झालेल्या दहशतवादी हल्ल्याची योजनाही इथे तयार झाली होती.**

**मरकझ तैयब्बा मुरिदके**

आंतरराष्ट्रीय सीमेपासून हे केंद्र १८ ते २५ किलोमीटरवर आहे. **२६ नोव्हेंबर २००८ रोजी मुंबईत मोठा दहशतवादी हल्ला झाला होता. त्यात सहभागी दहशतवाद्यांनी इथून प्रशिक्षण घेतले होते.**

**मरकझ सुभानअल्ला-बहावलपूर**

आंतरराष्ट्रीय सीमेपासून हे केंद्र १०० किलोमीटरवर आहे. 'जैश ए मोहम्मद' या दहशतवादी संघटनेचे ते मुख्यालय होते. **इथे दहशतवाद्यांना प्रशिक्षण दिले जात असे आणि दहशतवाद्यांचे म्होरके इथे येत असत.**

**यातील एक महत्त्वाचे तंत्र आहे 'लॉइटरिंग म्युनिशन' (Loitering Munition). त्याला 'एलएमएस'देखील म्हणतात. तुम्ही हवेत उडणारे 'ड्रोन' बघितले आहे का? 'एलएमएस' हे एक वेगळ्या प्रकारचे ड्रोन आहे असेही म्हणता येईल. त्यात माणूस बसण्याची गरज नसते. लष्कराला ज्या दहशतवादी केंद्रावर हल्ला करायचा आहे, त्याच्या वर हे 'एलएमएस' उडतात आणि नेमक्या वेळेला, नेमक्या भागावर हल्ला करू शकतात. त्यामुळे दहशतवादी तळ सोडून इतर भागाचे नुकसान होणे टाळता येते. हल्ला करण्याचे केंद्र निश्चित झाले, की 'एलएमएस' त्याला लक्ष्य करते आणि 'एलएमएस'चाही तिथेच स्फोट होतो.**

# छोटे आम्ही...

छोटे झालो आम्ही
हेच आमचे चुकले
मोठे राहिलो असतो
तर सर्व असे नसते वागले ।।१।।


छोटे आम्ही म्हणून
देतात पाठीत धपाटा
मोठे असलो असतो
तर होता शाबासकीची धकाटा ।।२।।

छोटे आम्ही म्हणून
मत नाही घेणार,
पण आम्हालाही सरकार
काही नियम लावणार ।।३।।

आम्हाला नको
मोठ्यांचे जग
आमच्या जगाचा
आहे देव रक्षक ।।४।।

छोटे आहोत आम्ही
हेच फार बरे
मोठ्यांचे ते जग
नको बाबा रे ।।५।।

**- किरण दशमुखे,**
मुख्याध्यापक, स्वामी विवेकानंद
बाल विकास मंदिर सटाणा



# मसाल्यांचे पत्र

**तीर्थरूप जायफळदादास,**
**दालचिनीताईचा नमस्कार...**

पत्र लिहिण्यास कारण की,

बदामकाका, वेलदोडेभाऊ, खोबऱ्याचे वडील हे सर्व जण सुखरूप पोहोचले आहेत. आनंदाची बातमी म्हणजे जिरी यांची कन्या मिरी हिचे लग्न मोहरी यांचे सुपुत्र लवंगकुमार यांच्याशी ठरलेले आहे, तरीही सर्वांनी या कार्यक्रमास उपस्थित राहावे.

मनुकेकाका यांना बरे वाटत नाही. त्यामुळे त्यांना शेजारच्या बडीशेपकाकांचे औषधोपचार चालू आहेत. गुरुवारी साखर व चहा पावडरचे भांडण झाले. त्यामुळे रागाच्या भरात साखरेने सायंकाळी उकळत्या पाण्यात उडी घेतल्याने कांदेकाका दिवसभर रडत होते. ते कोपऱ्यात बसून ढसाढसा रडले. त्यांनी दुसऱ्यांनाही खूप रडवले. असो!

बाकी, मी इकडे बरी आहे. माझे पती अक्रोड खूप कडक असल्यामुळे मला फार शिस्तीत राहावे लागते. मिरचीताई, लसूणदादा यांना नोकरी लागल्याबद्दल गोड - गोड शुभेच्छा...!

तुमची लाडकी,
**दालचिनीताई**

**- संकलन : विराज गायकवाड,** सातवी
विद्या प्रतिष्ठान इंग्लिश मीडियम स्कूल, बारामती.


# माझा जिवलग मित्र झाड!

झाडे ही निसर्गाची अमूल्य देणगी आहेत आणि माझ्या जीवनात त्यांना विशेष स्थान आहे. माझा एक आवडता मित्र म्हणजे आमच्या घरासमोरील मोठा वटवृक्ष! लहानपणापासून मी त्याच्या सावलीत खेळतो आहे. आजही तो मला शांतता व आनंद देतो. तो केवळ मला म्हणजे माणसांना ऑक्सिजन देत नाही, तर अनेक पक्ष्यांना आणि प्राण्यांना आश्रयही देतो. उन्हाळ्यात त्याच्या थंड सावलीत बसणे खूप सुखद वाटते. पावसाळ्यात त्याच्या पानांवरून टपटप पडणारे थेंब मनाला आनंद देतात.

झाडे आपल्याला फळे, फुले, औषधी वनस्पती आणि लाकूड देतात. त्याशिवाय ते जमिनीत पाणी साठवण्यास मदत करतात आणि पर्यावरणाचा समतोल राखतात. झाडांमुळे आपले वातावरण स्वच्छ आणि शुद्ध राहते. पक्षी आणि प्राणी यांच्यासाठीही झाडे घरासारखी असतात. अनेक छोटे प्राणी, कीटक आणि पक्षी झाडांवर राहतात आणि त्यांच्या फळांवर जगतात.

माझ्या झाडाचा आणि माझा अतूट स्नेह आहे. जसे एक मित्र आपल्या मित्राची काळजी घेतो, तसेच मीही या झाडाची काळजी घेतो. त्याला वेळेवर पाणी घालतो, त्याच्या आजूबाजूची जागा स्वच्छ ठेवतो आणि इतरांनाही झाडे लावण्याचा सल्ला देतो. झाडे आपले खरे मित्र असतात-निर्व्याज प्रेम करणारे, आयुष्यभर साथ देणारे. त्यामुळे आपण सर्वांनी झाडे लावली पाहिजेत आणि त्यांचे संगोपन केले पाहिजे, कारण हे निसर्गाचे खरे सौंदर्य आहे.

**- उदित रहांगडाले,** सातवी
विद्या प्रतिष्ठान इंग्लिश मीडियम स्कूल, बारामती





**अर्णवी बनसोडे,** आठवी
महात्मा गांधी विद्यालय, राजगुरुनगर



**औदुंबर पांडुरंग भास्कर,**
कांतीलाल शहा विद्यालय, तळेगाव दाभाडे



**समृद्धी गायकवाड,** सहावी
जि.प.प.स. भाटशिरपुरा, ता. कळंब, जि. धाराशिव



**पूर्वा कुळे,**
विश्वकर्मा विद्यालय मराठी प्राथमिक, पुणे



**सिद्धी उमाटे,** दहावी, श्री दादा महाराज नाटेकर
पंचकोशाधारित गुरुकुल विद्यालय, चिखली, पुणे




**समर्थ दळवी,** आठवी
श्री फत्तेचंद जैन विद्यालय, चिंचवड

? २) झाडे कशाचा समतोल राखतात?

✔ ४) ‘स्पिरिटेड अवे’ हा चित्रपट घिबली आर्टमध्ये आहे.

चित्र रंगवा.



सकाळ एनआयई आयोजित

# शालेय विद्यार्थ्यांसाठी निबंध स्पर्धा



स्पर्धेचे विषय

१ माझा आवडता छंद

२ माझी अविस्मरणीय सुट्टी

३ ए.आय. : मित्र की शत्रू?

अंतिम मुदत : २० मे २०२५

नियमावली

- स्पर्धा इयत्ता ५ वी ते ९ वीच्या विद्यार्थ्यांसाठी आहे.
- निबंध २५० ते ३०० शब्दांत लिहावा. त्यापेक्षा मोठा निबंध ग्राह्य धरला जाणार नाही.
- विद्यार्थ्यांनी स्वतः विचार करून निबंध लिहावा. कुठूनही कॉपी करू नये. तसे आढळल्यास निबंध बाद केला जाईल.
- विद्यार्थ्यांनी निबंध स्वतःच्या हाताने लिहून त्यानंतर त्याचा फोटो दिलेल्या क्यू. आर. कोडवर अपलोड करावा. निबंध pdf किंवा jpeg स्वरूपात पाठवावे. टाइप केलेले निबंध पाठवू नयेत.
- स्पर्धेचा निकाल 'एनआयई'च्या अंकात जाहीर केला जाईल.



बक्षीस

पहिल्या २० विजेत्यांना आकर्षक 'स्कूल बॅग'

निबंध पाठविण्याकरिता क्यू. आर. कोड

सफर गड-किल्ल्यांची

ओंकार ओक

# प्रेक्षणीय रोहिडा उर्फ विचित्रगड

पावसाळ्यात सगळीकडे हिरवागार निसर्ग असतो. या दिवसांत कुठेतरी बाहेर फिरून यावंसं वाटतं. तसं एक चांगलं ऐतिहासिक ठिकाण आहे- 'रोहिडा'- म्हणजे 'विचित्रगड'. या गडाचं वैशिष्ट्य हे, की इथे फिरायला शक्यतो जून ते फेब्रुवारी याच कालखंडात जातात. तेव्हा एखाद्या माहितगार ट्रेकरबरोबर सहकुटुंब या किल्ल्यावर जायचा प्लॅन आखायला सुरूवात करा!

## जायचं कसं?

पुण्याहून सर्वप्रथम भोर इथे जायला लागेल. तिथून सुमारे १० किलोमीटर्सवर रोहिडा किल्ल्याच्या पायथ्याशी बाजारवाडी गाव आहे. या गावात जाण्यासाठी एस.टी. आणि खासगी जीप्सची भरपूर प्रमाणात वाहतूक आहे. भोरच्या शिवाजी चौकातून डावीकडे वळून मांढरदेवीकडे जाणाऱ्या रस्त्यावर हे बाजारवाडी गाव आहे.







### जेवणाची सोय

जेवण बरोबर ठेवावे किंवा भोरमध्ये जेवणाची सोय होऊ शकते.

### पाण्याची सोय

गडावर भरपूर पाणी आहे.

पुरंदरच्या तहाचा भाग म्हणून छत्रपती शिवाजी महाराजांना हा किल्ला मुघलांच्या सुपूर्द करावा लागला; पण नंतर महाराजांनी तो परत घेतला. कालांतराने मुघलांनी हा किल्ला पुन्हा आपल्याकडे घेतला व भोरच्या पंत सचिवांनी तो परत स्वराज्यात आणला.

भोर-मांढरदेवी या रस्त्याला लागल्यापासूनच रोहिडा किल्ला त्याच्या बुरुजांच्या वैशिष्ट्यपूर्ण रचनेमुळे दुरूनही दिसतो आणि लक्ष वेधून घेतो. बाजारवाडी गावातून सोप्या चढाईने एक-दीड तासांत गडाचा पहिला दरवाजा गाठता येतो. गडाच्या पहिल्या दरवाजावर गणेशपट्टी कोरलेली आहे. पुढे गडाचा दुसरा दरवाजा लागतो. इथे समोरच पाण्याचे बारमाही टाके आहे. पुढे रोहिडा किल्ल्याचा शेवटचा दरवाजा असून या दरवाजावर दोन्ही बाजूंना हस्तीमुख- म्हणजे हत्तीचे शीर कोरण्यात आले आहे. दरवाजावर एक फारसी शिलालेख आणि त्याचेच भाषांतर केलेला मराठी शिलालेख आहे. त्यात गडाच्या किल्लेदाराबद्दल माहिती कोरण्यात आली आहे.

यापुढे गडाच्या वास्तूंना सुरुवात होते. गडा वर रोहिडमल्लाचे नूतनीकरण केलेले मंदिर आहे. समोर पाण्याचं छोटं टाकं व दीपमाळ आहे.

गडावर शिरवले बुरूज, वाघजाई बुरूज, पाटणे बुरूज, दामगुडे बुरूज, फत्ते बुरूज आणि सदरेचा बुरुज, असे सहा बुरूज आहे. गडावर सदरेची वास्तू आहे.

पिण्याच्या पाण्याच्या भरपूर टाक्या गडावर आढळतात. गडावरून रायरेश्वर, केंजळगड, कमळगड, मांढरदेवी, राजगड, तोरणा यांचं सुंदर दर्शन होतं.

शिवकाळात आणि एकूणच मराठी इतिहासात रोहिडा किल्ल्याचं महत्त्व मोठं आहे. भोर तालुक्यातील रोहिडखोरे हा भाग रोहिडा किल्ल्याच्या नावानेच ओळखला जातो.

?३) रोहिडा गडावर किती बुरूज आहेत?

✔ १) 'द पॉवरपफ गर्ल्स' ही मालिका क्रेग मॅक्क्रेन यांनी साकारली.

# विक्रमांची अजब दुनिया

दोस्तहो, विक्रमांची दुनिया अजब आणि अतर्क्य. चला तर, विक्रमांच्या पोतडीत या वेळी काय काय आहे ते बघूया.



## सर्वांत उंच व सर्वांत पिटुकला कुत्रा भेटले!

**अनेक पालक मुलांना सुट्टीच्या दिवशी एकमेकांकडे खेळायला पाठवतात. तसेच अमेरिकेत दोन कुत्रे एकमेकांकडे खेळायला गेले.** यातला एक आहे जगातील सर्वांत उंच, भलामोठा कुत्रा, तर दुसरी जगातील सर्वांत पिटुकली कुत्री! अमेरिकेच्या 'आयडाहो' या राज्यातील 'रेजी' हा 'ग्रेट डेन' जातीचा कुत्रा आहे. 'ग्रेट डेन' कुत्रे उंच व धिप्पाड असतात. रेजीची उंची आहे ३ फूट ३ इंच. त्याची नवी मैत्रीण आहे 'पर्ल'. ही आहे 'चिहुआहुआ' जातीची. पर्लची उंची फक्त ३.५९ इंच आहे आणि ती एका तळहातावर मावते! हे दोघे भेटणार म्हटल्यावर रेजी पर्लवर दादागिरी करेल, अशी त्यांच्या मालकांना चिंता होती. पण रेजीने पटकन पर्लशी ओळख करून घेतली आणि दोघांचा खेळ रंगला.



## ११५ वर्षांची उत्साही आजी

**एथेल केटरहॅम ही जगातील सर्वांत जास्त वयाची आजी ठरली आहे. एथेल यांचा जन्म २१ ऑगस्ट १९०९ रोजी झाला.** ११५ वर्षं आणि २५२ दिवस इतकं वय असलेल्या एथेल, या १९०९ या वर्षात जन्मलेल्या एकमेव जिवंत व्यक्ती आहेत. महत्त्वाचे म्हणजे या वयातही एथेल उत्साही आणि सकारात्मक आहेत. त्या सांगतात, की 'चालून आलेली कोणतीही चांगली संधी सोडू नका, कारण त्यातूनच तुम्हाला नवे अनुभव मिळतील. नेहमी सकारात्मक दृष्टिकोन ठेवा आणि खाण्यापिण्यातच नव्हे, तर इतरही गोष्टींत कशाचा अतिरेक करू नका.' छान सल्ला आहे ना?... ११० वर्षांची असताना एथेल यांना करोना झाला होता. त्या वेळीही त्यांनी सकारात्मकतेने उपचार घेतले आणि करोना पळून गेला. किती प्रेरणादायी आहेत एथेल आजी!

## सलग ५ दिवस स्वयंपाक!

**इव्हेट क्विबिया या तरुण शेफनी सलग १४० तास ११ मिनिटे (म्हणजे जवळपास सलग ५ दिवस) रेस्टॉरंटमध्ये स्वयंपाक करून वेगळाच विक्रम नोंदवला. इव्हेट मूळच्या लायबेरिया या आफ्रिकन देशातल्या आहेत.** त्या ऑस्ट्रेलियामध्ये राहत असून मेलबर्नमधील स्वतःच्या रेस्टॉरंटमध्ये त्यांनी हा विक्रम केला. त्यांनी प्रामुख्याने पश्चिम आफ्रिकन खाद्यसंस्कृतीतील पदार्थ बनवले आणि सर्वांसाठी रेस्टॉरंट खुले ठेवले. ५ दिवस सलग स्वयंपाक करणे अजिबातच सोपे नाहीये बरे! या विक्रमात शेफला दर ४ तासांनी २० मिनिटांची सुट्टी घेण्याची मुभा असते. इव्हेट यांना सतत शेगडीपाशी काम करणे, पुरेशी झोप न घेणे, यामुळे त्रास झाला. पण ठरवलेला विक्रम त्यांनी पूर्ण केला.




## एका मिनिटांत ४५३ बॉक्सिंग पंच



युनायटेड किंग्डममधील मार्शल आर्टिस्ट जोशुआ इयाला यांनी बॉक्सिंग पंच मारण्याचे तीन विक्रम मोडले आहेत. बॉक्सिंग ग्लोव्हज् न घालता एका मिनिटात सर्वाधिक- म्हणजे ४५३ 'फुल एक्स्टेन्शन पंच' मारणे, बॉक्सिंग ग्लोव्हज् घालून एका मिनिटात ३७४ पंच मारणे आणि हातांत एक किलोचे डंबेल्स घेऊन एका मिनिटात ३३३ पंच मारणे, असे हे विक्रम आहेत. हे विक्रम सगळ्यांना जमणारे नाहीत. त्यासाठी जोशुआ यांनी सातत्याने प्रशिक्षण घेत सराव केला. त्यांना त्यांच्या वडिलांनी वयाच्या सातव्या वर्षापासून सक्तीने तायक्वोंदो शिकायला लावले होते. सुरुवातीला त्यांना त्याचा कंटाळाच येत असे, पण सोळा वर्षांच्या वयात मात्र जोशुआ यांना मार्शल आर्ट्सची गोडी निर्माण झाली.

## स्क्रीन टाइम

### स्पिरिटेड अवे (२००१)



### कशासाठी बघायचा चित्रपट?

- सुरुवातीला घाबरलेली चिहिरो नंतर मात्र शांतपणे व धाडसाने संकटातून मार्ग काढते. हे आपल्यासाठीही प्रेरणादायी आहे.
- नदीदेवतेचा दुर्गंधीयुक्त आत्मा माणूस करत असलेल्या प्रचंड प्रदूषणाची साक्ष देतो. निसर्ग जपायला हवा, हा संदेश या चित्रपटात आहे.
- युबाबा चिहिरोचे नाव बदलते, पण चिहिरो तिचे खरे नाव विसरत नाही. आपली मूळची ओळख कधीही विसरू नका, असे हा चित्रपट सांगतो.

## 'घिबली आर्ट'ने सजलेला चित्रपट



**दोस्तांनो, सध्या इंटरनेटवर आपला फोटो 'घिबली स्टाइल' करून घेण्याचा 'ट्रेन्ड' आलाय. वेगवेगळ्या ॲप्समध्ये 'घिबली' हे नवीन फीचर दिलेलं असतं आणि आपण त्याला जो फोटो देऊ, तो या फीचरने जपानी पद्धतीच्या क्यूट कार्टून रूपात दिसतो. अर्थात स्वतःचे फोटो कुठल्या खासगी ॲपला न पुरवणेच चांगले; त्यामुळे तुम्ही 'घिबली फोटों'च्या नादाला लागू नका! पण या 'घिबली आर्ट'मध्ये छान चित्रपट तयार झाले आहेत. त्यातील एक आहे 'स्पिरिटेड अवे'.**

### चित्रपटाची गोष्ट

चिहिरो ही १० वर्षांची मुलगी आई-बाबांबरोबर नवीन गावी राहायला चाललेली असते. त्यांना वाटेत एक अनोळखी गाव लागते. तिथे माणसे नसतात, पण समोर चविष्ट अन्नपदार्थ ठेवलेले असतात. आई-बाबांना राहावत नाही आणि 'आपण नंतर पैसे देऊ,' असे म्हणून ते जेवायला बसतात. चिहिरो आजूबाजूला फिरत असते. परत आल्यावर तिला दिसते, की तिच्या आई-बाबांचे चक्क डुकरांमध्ये रूपांतर झाले आहे. सूर्यास्त होतो आणि त्याबरोबरच ते भीतिदायक गाव जिवंत होते. या गावात विचित्र प्राणी, देव, आत्मे सगळेच राहत असतात. आई-बाबांना डुक्कररूपातून माणसाच्या रूपात परत कसे आणावे, याची चिंता चिहिरोला लागते. तिला हाकू नामक मुलगा भेटतो. तो सांगतो, "तुला युबाबा या जादूगारिणीकडे नोकरी करावी लागेल. तसेच तू जर स्वतःचे नाव विसरलीस, तर कायमची इथेच राहशील." युबाबा चिहिरोला एका स्नानगृहात काम करायला लावते. एकदा या स्नानगृहात एक आत्मा येतो. त्याला अतिशय दुर्गंधी येत असते. चिहिरो त्याला स्वच्छ करते. मग तिला समजते, की हा आत्मा खरे तर एका प्रदूषित नदीदेवतेचा आहे! अखेर एक दिवस युबाबा चिहिरोला सांगते, की 'डुकरांत रूपांतर झालेल्या अनेक जणांमधून तू तुझ्या आई-वडिलांना ओळखू शकलीस, तर तू अंतिम चाचणी पार करशील.' चिहिरोला हे जमते का? चिहिरो आणि तिचे आई-बाबा मानवरूपात आपल्या नेहमीच्या जगात परत येतात का? हाकू कोण असतो? या प्रश्नांची उत्तरे या चित्रपटात आहेत. हा चित्रपट नेटफ्लिक्सवर उपलब्ध आहे.

### चित्रपटाची वैशिष्ट्ये

हा चित्रपट सरधोपट नाहीये. त्याची गोष्ट जरा गुंतागुंतीची आहे. अगदी लहान मुलांना ही गोष्ट कदाचित समजणार नाही आणि त्यांना काही दृश्यांची भीतीही वाटेल. ९-१० वर्षांच्या वरची मुले हा चित्रपट पाहू शकतील. या चित्रपटाचे महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे अतिशय सुंदर 'घिबली' चित्रे. हा चित्रपट पाहून त्यातील घिबली चित्रांसारखी चित्रे काढायचा प्रयत्न तुम्ही नक्कीच करू शकाल.

## माय रेसिपी

मित्रांनो, तुमच्या आई-बाबांच्या बालपणी सगळ्यांकडे फ्रिज नव्हते. उन्हाळी सुट्टीत ज्यांच्या घरी फ्रिज असेल, ती मुलं मित्रांना जमवून चक्क बर्फाचे खडे कुडूम-कुडूम खायची! "अरे घशात अडकेल बाबा!" , "बास आता, घसा बसेल!" या दटावणीचाही त्यांच्यावर परिणाम व्हायचा नाही! आज आपण बर्फाचं अप्रूप पुन्हा अनुभवूया... पण थोड्या वेगळ्या रूपात.

### प्रयोग करा

उन्हाळी सुट्ट्यांत पाहुण्यांना 'इम्प्रेस' करण्यासाठी हा मस्त उपाय आहे! आइस ट्रेमध्ये फळांच्या तुकड्यांची कलात्मक रचना तुम्हाला करता येईल. हे आइस क्यूब्ज अगदी रत्नांच्या खड्यांसारखे सुंदर दिसतात. त्यात भरपूर प्रयोग करा आणि तुमच्या या 'क्रिएशन'चे फोटोही काढा.

## मजेदार बर्फ!

### साहित्य

आंबटपणा असलेली फळे- उदा. स्ट्रॉबेरी, अननस, अर्धवट पिकलेला आंबा, किवी, संत्री, लिंबू, करवंद, बेरीज् (उदा. उन्हाळ्यात आपल्याकडे मलबेरी (तुती) मिळतात किंवा हल्ली ब्लूबेरी मिळू लागली आहे.), कलिंगड, पुदिन्याची पाने आणि काही लिंबाच्या फोडी (लिंबू पिळण्यासाठी).

### कृती

बर्फ करायचा ट्रे स्वच्छ धुऊन घ्या. तुम्हाला आवडतील त्या फळांचे छोटे तुकडे करून घ्या. आइस ट्रेच्या प्रत्येक चौकोनात थोडे थोडे फळांचे तुकडे घाला, एखादे पुदिन्याचे पान घाला. संपूर्ण आइस ट्रेमध्ये मिळून अर्धे लिंबू पिळा. (नको असेल, तर लिंबाचा रस वगळला तरी चालेल.) आइस ट्रेमध्ये पिण्याचे पाणी भरा आणि फ्रिजरमध्ये ठेवून बर्फ तयार होऊ द्या. नंतर ट्रे बाहेर काढून फळयुक्त बर्फाचे तुकडे ग्लासेसमध्ये काढा. ग्लासमध्ये पिण्याचे पाणी भरा. तुम्ही पाणी प्याल, तसा बर्फ वितळेल. पाण्याला त्या फळाचा स्वाद लागेलच, पण लिंबाची आंबट चवही येईल. शेवटी फळांचे तुकडे उरतील, ते खाऊन टाकायचे! आहे ना मजा!

### हे लक्षात ठेवा

फळांचे लहान तुकडे करताना सुरी वापरावी लागते. त्यामुळे आई-बाबा बरोबर असलेले चांगले. फळयुक्त बर्फ केल्यानंतर जास्त दिवस ठेवायचा नाही. लगेच सगळ्यांना देऊन संपवून टाकायचा.



?४) 'स्पिरिटेड अवे' हा चित्रपट कोणत्या आर्टमध्ये आहे?

✓ ८) 'विठू विठू विठोबा' हे पुस्तक रेणू दांडेकर यांनी लिहिले आहे.

पेटोपिया



# मनीमाऊबद्दलच्या Fun Facts!

**मित्रांनो, तुम्ही मांजरांच्या रंगांचे निरीक्षण केले आहे का?... काही मांजरांचा रंग चमकदार काळा असतो, काहींचा पांढराशुभ्र, तर काही असतात काळी-पांढरी! काही काळसर-राखाडी रंगांची व अंगावर पट्ट्यांपट्ट्यांसारखं 'डिझाईन' असलेली असतात. काही केशरी रंगाची, तर काही हे सर्व रंग मिश्र असलेली असतात. मांजरे क्यूट दिसतात, यात कुणाचेच दुमत असणार नाही; पण तुम्हाला हे माहितीय का, की मांजराच्या पिलाचा रंग कोणता असेल, हे ठरते त्यांच्या आई-बाबांच्या 'जीन्स'वरून- म्हणजे जनुकांवरून! आज पण मांजरांच्या रंगांशी संबंधित काही रंजक गोष्टी जाणून घेऊया.**

## तिरंगी मांजरे

अनेक मांजरांमध्ये पांढरा, काळा आणि केशरी या रंगांचे छानदार मिश्रण असते. यातील एखाद्या मांजरात पांढरा रंग जास्त असतो, काहींमध्ये काळा रंग जास्त असतो, तर काहींमध्ये केशरी रंगही भरपूर असतो. मात्र तिन्ही रंग हवेतच! या 'तिरंगी' मांजरांना 'कॅलिको कॅट' असे म्हणतात. या मांजरांचे सर्वांत मोठे वैशिष्ट्य असे, की जवळपास ९९.९ टक्के तिरंगी मांजरे या माद्या असतात- म्हणजे मांजरी असतात! ३००० तिरंगी मांजरांमध्ये केवळ १ मांजर नर असते. म्हणजेच २९९९ तिरंगी मांजरींमागे फक्त एक तिरंगी बोका! हे घडते फक्त विशिष्ट जनुकांमुळे. आहे ना मजा?...



## केशरी मांजरे

- केशरी रंगाची फर असलेल्या मांजरांना इंग्लिशमध्ये 'ऑरेंज कॅट', 'जिंजर कॅट' किंवा 'मार्मालेड कॅट' म्हणतात. या रंगातसुद्धा पिवळसर केशरी, हलका केशरी, गडद केशरी अशी छटा असतात. या केशरी मांजरांची खासियत अशी, की जवळपास ८० टक्के केशरी मांजरे नरच असतात. केवळ २० टक्के केशरी मांजरे माद्या असतात. इंटरेस्टिंग आहे ना?...
- तुम्ही केशरी मांजर पाळलेल्या कुणाला विचारलंत, की "काका/काकू, तुमच्या मांजराचा स्वभाव कसा आहे हो?", तर ते तुम्हाला खात्रीनं सांगतील, "काय सांगू बाळा तुला... आमचा बोका सारखा इकडेतिकडे नाचतो, ओरडत बसतो, वस्तू पाडतो आणि फोडतो..."
- केशरी मांजरांना 'अतिउपद्व्यापीपणा' हे स्वभाववैशिष्ट्यच चिकटलं आहे! असं का झालं असावं?... याला खरं तर काही शास्त्रीय आधार नाहीये. पण लक्षात ठेवा, त्यांच्यात ८० टक्के बोके असतात ना! बोका- म्हणजे नर मांजरांमध्ये 'हा माझा इलाका आहे, इकडे मी राजा!' असा एक माज असतो. एकमेकांच्या खोड्या काढून भांडणे करणे, बाहेर जाऊन हुंदडणे, अशा गोष्टी बोके जास्त करतात. त्यामुळे केशरी मांजर म्हटले, की खोडकर आणि उपद्व्यापी हे शब्द येतातच!



## या आहेत अतिप्रसिद्ध केशरी मांजरी!

- कार्टूनच्या माध्यमातून अनेक प्राणी प्रसिद्ध झाले आहेत. यातली दोन जगप्रसिद्ध मांजरे म्हणजे 'गारफील्ड' आणि 'पुस इन बूट्स'.
- 'गारफील्ड' हा केशरी रंगाचा 'पर्शियन' बोका आहे. मात्र तो इतर केशरी मांजरांसारखा हुंदडत नाही! तो खूप आळशी आणि घरबशा आहे. त्याला पिझ्झा, पास्ता, लझानिया असे पदार्थ खायला खूप आवडतं आणि नुसता आराम करायला आवडतो. गारफील्डला खरी लोकप्रियता मिळाली ती त्याच्या बोलण्यामुळे! हा बोका स्वतःच्या इतका प्रेमात आहे ना, की त्याने इतरांच्या बोलण्यावर दिलेल्या प्रतिक्रिया काही काही वेळा फार विचित्र आणि गंमतशीर असतात.
- 'पुस इन बूट्स' हा दुसरा केशरी रंगाचा बोका लोकप्रिय झाला, तो त्याच्या शूरवीर, पण तितक्याच गमत्या स्वभावामुळे. हा बोका २००४ मध्ये 'Shrek 2' या चित्रपटात दिसला आणि लहान मुलांना भलताच आवडला. पुढे त्याची प्रमुख भूमिका असलेले 'पुस इन बूट्स' याच नावाचे चित्रपट निघाले. त्याच्यात 'ऑरेंज कॅट'ची 'टिपिकल' स्वभाववैशिष्ट्ये भरपूर आहेत.



खेळ खेळूयात

# फिरता बेसबॉल

डॉ. अमृता देशपांडे-देशमुख

**या खेळासाठी एक बॅट आणि काही चेंडू हे साहित्य लागणार आहे.**

### कृती

- चौकोन आखून घ्यावा. त्याच्या एका कोनावर खेळाडू बॅट घेऊन उभा करावा आणि बाकी तीन कोनांवर ३ खेळाडू उभे करावेत. एक खेळाडू मध्यभागी उभा करावा.
- खेळाडूंची संख्या जास्त असेल, तर दोन बाजूंच्या मध्येही खेळाडू उभे करावेत.
- चौकोनाच्या मध्ये असणाऱ्या खेळाडूने एक चेंडू बॅट असलेल्याकडे टाकावा आणि त्याने तो त्याच्या उजव्या बाजूच्या खेळाडूंकडे मारावा. तसेच, डाव्या बाजूकडून दुसरा चेंडू पुन्हा बॉलरकडे टाकावा. अशा प्रकारे दोन्ही साखळ्या चालू ठेवाव्या.
- या खेळात हार-जीतपेक्षाही मजा खूप येते.

### कौशल्ये.

- या खेळामुळे समन्वय सुधारतो. हाता-पायांची ताकद वाढते. एकाग्रता सुधारते.
- क्रिकेट, बेसबॉल, हॉकी यांसारख्या खेळासाठी हा खेळ पूरक आहे.



अॅप माझे

## डीआयवाय सोलर सिस्टिम

**मित्रांनो, ग्रहमाला शाळेच्या अभ्यासात असते, पण त्या व्यतिरिक्तही अनेकदा त्या विषयीच्या बातम्या कळत असतात. चंद्रावर, मंगळावर पाठवलेली याने, अवकाश स्थानकात जाणारे अंतराळवीर, हे ऐकताना अधिक काही समजून घ्यावेसे वाटते. ग्रहमाला आणि एकूणच अवकाशाचे प्रयोगांतून आकलन करून घेण्यासाठी एक उत्तम अॅप आहे** 'डीआयवाय सोलर सिस्टिम'.

### ॲपमध्ये काय काय?

- 'चिल्ड्रन्स क्रिएटिव्हिटी म्युझियम- सायन्स सेंटर' आणि 'म्युझियम ऑफ लाइफ अॅण्ड सायन्स' यांनी 'लॉरेन्स हॉल ऑफ सायन्स- यूसी बर्कली'च्या सहकार्याने हे अॅप तयार केले आहे.
- हे अॅप गूगल प्लेस्टोअरवरून मोफत डाउनलोड करता येते. त्यात जाहिरातीही नाहीत.
- या अॅपमध्ये 'अॅक्टिव्हिटीज्', 'इन ऑर आउट गेम' आणि 'प्लॅनेट वॉक' असे तीन विभाग आहेत.
- 'अॅक्टिव्हिटीज्'मध्ये मुलांना करता येतील असे काही प्रयोग आणि कार्यानुभव दिलेले आहेत. काही प्रयोग व कार्यानुभवांसाठी पालक वा शिक्षकांची थोडी मदत लागेल.
- 'इन ऑर आउट' या खेळात अवकाशात आढळणाऱ्या वस्तूंची माहिती दिली आहे (उदा. स्पेसक्राफ्ट.) ती वस्तू ग्रहमालेच्या अंतर्गत येईल, की आकाशगंगेच्या अंतर्गत येईल, हे आपण ओळखायचे.



### प्रयोगांतून ग्रहमालेचे आकलन

**कोणासाठी?**

- ४ वर्षांच्या वरच्या कुणासाठीही. (काही प्रयोगांत मोठ्यांची मदत आवश्यक.)
- पालक व शिक्षकांना अवकाशविषयक धडे घेताना उत्तम पूरक माहिती.

### शिक्षक व पालकांसाठी

- मुलांना सुट्टीत करण्यासाठी यातील 'डीआयवाय अॅक्टिव्हिटीज्' उत्तम आहेत. उदा. बर्फाचे ग्रह/ तारे बनवा, अवकाश प्रवासाला जाताना बॅगमध्ये काय भराल?, अंतराळवीर खातात, तसे अन्न घरी तयार करा.
- प्रत्येक प्रयोगाला लागणारे साहित्य, 'स्टेप बाय स्टेप' कृती आणि प्रयोगातून काय शिकायचे, हे अॅपमध्ये दिले आहे.
- हा मजकूर इंग्लिशमध्ये आहे. मुलांना पालक वा शिक्षकांची मदत मिळाली, तर अॅक्टिव्हिटी करणे सोपे जाईल.

CYBER SECURITY
Net Protector
NPAV
Total Security
922.566.48.17
922.566.48.11
Mobile Security

५) गारफिल्ड कोणत्या प्रकारचा बोका आहे?

३) रोहिडा गडावर सहा बुरूज आहेत.

# PLANNING FOR A ROAD TRIP

Alchemize

## Deciding the Route

Person 1: Should we take the highway or the scenic route?
Person 2: I think the scenic route would be more fun. We'll get to see some beautiful places along the way.
Person 1: Sounds great! Let's plan a few stops for sightseeing.

## Packing for the Trip

Person 1: Don't forget to pack extra water and snacks for the road.
Person 2: I've got that covered. I'll also bring a first-aid kit, just in case.
Person 1: Perfect! And we should definitely bring a portable charger.

## Car Maintenance Check

Person 1: Did you check the car's tires and oil?
Person 2: Yes, I did. Everything is good to go, but I'll double-check the fuel level before we leave.
Person 1: Great! We don't want to run out of fuel in the middle of nowhere.

## Deciding on Accommodation

Person 1: Should we book hotels in advance or find places along the way?
Person 2: It might be better to book a couple of stops ahead of time. That way, we have a place to rest without any stress.
Person 1: Good idea! I'll look up options for the first night.

## Preparing for Entertainment

Person 1: What should we do for entertainment during the long drive?
Person 2: We can make a road trip playlist, and I've also downloaded some audiobooks!
Person 1: Nice! That will make the drive so much more enjoyable.



# ESSAY WRITING

### Sharing Knowledge and Facts

Last time, we learned about compare and contrast essays. This time, we will focus on how to write an informative essay, where your goal is to share information and educate the reader about a particular topic.

An informative essay is meant to inform the reader about a specific subject by providing facts, explanations, and details. The purpose of this essay is not to persuade or entertain, but to present clear and accurate information in a well-organized manner. Steps :

1. **Choose a Topic :** Pick a subject you are interested in and know a lot about, such as a historical event, a famous person, or a scientific discovery.
2. **Research Your Topic :** Gather reliable information from books, articles, or websites. Make sure the facts are accurate and up-to-date.
3. **Write a Clear Introduction :** Introduce the topic to your reader and explain why it's important or interesting.
4. **Present the Information :** In the body of your essay, break down the information into logical sections. Each paragraph should cover a different aspect of the topic, providing details and examples.
5. **Use Clear Language :** Since your goal is to inform, make sure your language is simple, clear, and easy to understand.
6. **Conclude with a Summary :** Wrap up your essay by summarizing the key points and restating the importance of the topic.

### Example Topics :

The Solar System : Explain the different planets, their features, and how they orbit the sun.

The History of the Internet : Discuss how the internet was created and how it has evolved over the years.

### Sample Sentence :

"The internet has transformed the way we communicate, work, and learn, connecting people from all over the world in an instant."

An informative essay allows you to share knowledge and help the reader learn something new in a clear and organized way!

Alphabet Express

शीतल करंदीकर

दोस्तांनो, आज 'Alphabet Express' आली आहे पुढच्या स्टेशनवर. U तिथे वेळेच्या आधीच येऊन थांबला आहे. गाडी आल्या आल्या तो गाडीत चढला. आता खूप थोडे प्रवासी शिल्लक राहिले आहेत. या शब्दसफरीमध्ये भाग घेण्यासाठी! सर्वांच्या डोळ्यांमधले कुतूहल पाहून U ने लगेचच आपली शिदोरी उघडली आहे. पाहूया आपण ही तो कोणकोणत्या शब्दांची भर या मेजवानीत घालतो आहे ते!

# U अक्षराचा वापर

१) unkind = (उच्चार : अन्काइन्ड) = निर्दयी = She is very unkind to animals.

२) undue = (अन्डयू) = गैरवाजवी = Sometimes people take undue advantage of the freedom given to them.

३) underdog = (अन्डरडॉग) = अत्यंत दुर्दैवी अशी व्यक्ति = People show sympathy towards the underdogs in the society.

४) undergo = (अन्डरगो) = भोगणे = The old man needs to undergo an immediate surgery.

५) unfortunate = (अन्फॉरचुनेट) = कमनशिबी = She was unfortunate to have lost a good friend.

६) unless = (अन्लेस) =.... शिवाय = Unless you promise to come, I shall not leave from here.

७) undertake = (अन्डरटेक) = घेणे, अंगिकारणे = We must undertake social responsibility.

८) unknowingly = (अन्नोइंगली) = नकळत = She hurt her parents unknowingly.

९) unkempt = (अन्केंप्ट) = अस्ताव्यस्त, गलथान = His room was extremely unkempt.

१०) unanimous = (युनॅनिमस) = सर्वसंमत, एकत्रित = The jury gave a unanimous decision.

११) unclear = (अन्क्लियर) = अस्पष्ट = The picture is very unclear.

१२) unabashed = (अन्अबॅश्ड) = बिनधास्त = He stood there with an unabashed expression on his face.

१३) ultimatum = (उच्चार : अल्टीमेटम) = अंतिम पर्याय, अंतिम बाब = The principal gave her an ultimatum of writing an apology for her mistake.

१४) unambiguous = (अन्ॲम्बिग्यूअस) = स्पष्ट = The statement she made was totally unambiguous.

१५) unbiased = (अन्बायस्ड) = निःपक्षपाती, पूर्वग्रहविरहित = She spoke to her daughter with an unbiased mindset.



१६) unapproachable = (अन्अप्रोचेबल) = न पोहोचता येण्याजोगे = Her neighbours were unapproachable people.

१७) unconditional = (अन्कंडिशनल) = बिनशर्त = She had unconditional love in her heart for her friends.

१८) uncanny = (अन्कॅनी) = विचित्र, विलक्षण = She began to sense something uncanny around her.

१९) utility = (युटिलिटी) = उपयुक्तता = What is the utility of this electronic device?

२०) urban = (अर्बन) = नागरी, शहरातील = I live in a well-developed urban area.

U ने आणलेले हे शब्द पाहून सर्व जण खूप खूश झाले. त्याच्याशी गप्पा मारत मारत गाडी कधी पुढच्या स्टेशनच्या जवळ येऊ लागली ते त्यांना समजलेच नाही. आज आपल्याला या अंगतपंगतीत U पासून सुरू होणाऱ्या अधिकाधिक शब्दांची भर घालायची आहे. चला तर मग, शोधूया शब्द U चे!



STORY

# THE MYSTERIOUS VISITOR

Siddhi Sathe

In the small town of Mussoorie, nestled in the Himalayan hills, lived a boy named Raj. He lived in a quaint, old cottage with his grandmother, who told him stories about the mysterious people who once visited their town. The town was peaceful, surrounded by tall pine trees and the sound of chirping birds, making it a perfect place to grow up.

One evening, as the sun set behind the hills, Raj decided to explore the forest near their cottage. He loved walking through the woods, where the rustling of leaves and the chirping of crickets created an enchanting atmosphere. Raj often imagined meeting someone from the past while walking the forest trails.

As he walked deeper into the woods, he saw something unusual - a flickering light in the distance. Curious, he followed it, thinking it might be someone else. As he got closer, he realized the light was coming from an old, forgotten cabin hidden under thick vines and overgrown trees. Raj approached cautiously and knocked on the door. To his surprise, the door creaked open, revealing a man with a white beard, dressed in old clothes that looked like they belonged to another time. "Who are you?" Raj asked, his heart racing.

The old man smiled kindly. "I am a traveler, passing through these woods. I have seen many things in my life, but this place has a charm like no other."

Raj invited the man to sit with him and share a meal at his grandmother's house. As they sat down, the old man shared tales of his travels-of places far beyond the hills, filled with wonder and mystery. Raj listened, fascinated by the stories of lands he'd never seen.

When the man left the next morning, Raj went to the cabin, only to find it empty. It was as if the mysterious visitor had never been there at all.

Raj smiled, knowing that sometimes, the most magical experiences were the ones that couldn't be explained.

# WORD SEARCH PUZZLE

## ISLAND COUNTRIES

ICELAND
MADAGASCAR
CUBA
PHILIPPINES
JAPAN
BAHAMAS
PAPUA NEW GUINEA
IRELAND
SRI LANKA
CYPRUS
MAURITIUS
DOMINICAN REPUBLIC
BARBADOS
GRENADA
FIJI
MALDIVES
CAPE VERDE
COMOROS

| | | | | | | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| S | A | I | W | V | E | D | R | E | V | E | P | A | C | S | A | R | B | I | A |
| I | N | D | O | B | N | B | A | H | R | A | I | N | I | Y | P | R | H | S | I |
| T | R | O | B | A | H | A | M | A | S | G | R | E | N | I | U | S | A | J | F |
| R | U | E | L | R | P | H | I | L | O | P | W | A | K | N | A | L | I | R | S |
| I | N | E | L | B | C | U | B | S | L | A | E | T | E | S | B | F | T | E | O |
| N | C | E | M | A | I | S | E | N | O | D | N | I | O | A | U | S | P | A | R |
| I | E | S | A | D | N | W | I | R | M | L | N | W | M | N | C | R | A | S | O |
| D | I | W | U | O | E | D | A | N | O | R | O | A | A | O | G | J | P | T | M |
| A | C | G | R | S | P | S | O | L | N | P | C | P | L | J | R | A | U | Y | O |
| D | S | E | I | P | J | A | M | A | I | C | A | M | T | A | M | P | A | Z | C |
| A | E | A | T | A | H | M | A | L | S | J | I | G | A | M | E | A | N | U | M |
| N | V | S | I | P | P | O | D | H | L | T | C | O | N | A | D | Z | E | N | O |
| D | I | T | U | E | V | A | N | U | A | T | U | D | F | I | J | A | W | I | S |
| T | D | T | S | A | D | O | M | I | N | I | L | O | G | D | S | I | G | E | U |
| O | L | I | O | G | R | E | N | A | D | A | T | M | R | A | K | J | U | D | N |
| B | A | M | K | N | C | A | V | E | S | E | N | I | P | P | I | L | I | H | P |
| A | M | O | D | G | N | I | K | D | E | T | I | N | U | F | G | T | N | E | T |
| G | S | R | I | L | A | G | N | E | V | T | A | I | W | A | N | O | E | R | O |
| O | W | I | A | T | M | A | D | A | G | A | S | C | A | R | G | M | A | N | S |
| R | P | Y | C | I | L | B | U | P | E | R | N | A | C | I | N | I | M | O | D |

JAMAICA
NEW ZEALAND
DOMINICA
TAIWAN
SINGAPORE
SOLOMON ISLANDS
TONGA
SAINT LUCIA
UNITED KINGDOM
MALTA
INDONESIA
SAMOA
TRINIDAD AND TOBAG
HAITI
EAST TIMOR
BRUNEI
VANUATU
BAHRAIN

# CROSSWORD

## Oceania animals




1.kangaroo 2.cassowary 3.(→) lizard 3.(↓) .lyrebird 4.kookaburra 5.frigate 6.frog 7.possum 8.turtle 9.numbat 10.penguin

GRAMMAR BITE

# Onomatopoeia!

Onomatopoeia is a word that imitates or resembles the sound it represents. These words make writing or speech more vivid and help readers or listeners imagine the sound.




Examples

1. Buzz - The sound a bee makes.
   Example : I heard a loud buzz outside the window.
2. Splash - The sound of something hitting water.
   Example : The stone made a big splash when it hit the lake.
3. Boom - The sound of an explosion or a loud noise.
   Example : The fireworks went off with a loud boom!
4. Crash - The sound of something breaking or falling.
   Example : "I heard a crash when the vase fell off the table."
5. Creak - The sound of something moving slowly or squeaking.
   Example : "The door creaked as it opened."

Onomatopoeia makes writing more engaging by connecting words directly to sounds we experience!



## सुभाषित

**उपार्जितानां वित्तानां त्याग एव हि रक्षणम् ।**
**तडागोदरसंस्थानां परीवाह इवाम्भसम् ।।**

जसे तळ्यातील पाणी वाहू देणे, हा तळ्याच्या पाण्याचे रक्षण करण्याचा मार्ग आहे, तसेच दान हाच स्वकष्टार्जित संपत्तीचे रक्षण करण्याचा खरा मार्ग आहे.

# संस्कार

**आनंददायी शनिवार**

## सुविचार

चांगली स्वप्ने पाहणे आणि ती पूर्ण करण्याचा प्रयत्न करत राहणे यातूनच माणूस घडतो.



## गीता श्लोक

**यस्त्वात्मरतिरेव स्यादात्मतृप्तश्च मानवः।**
**आत्मन्येव च सन्तुष्टस्तस्य कार्यं न विद्यते॥**

जो मनुष्य आत्म्यामध्येच रमणारा आणि आत्म्यामध्येच तृप्त, तसेच आत्म्यामध्येच संतुष्ट असतो, त्याच्यासाठी कोणतेही कर्तव्य उरत नाही.

## दिनविशेष



**१० मे**

**२०१५ :** चित्रपटसृष्टीतील प्रतिष्ठेचा ‘दादासाहेब फाळके पुरस्कार’ ज्येष्ठ अभिनेते शशी कपूर यांना तत्कालीन केंद्रीय अर्थमंत्री अरुण जेटली यांच्या हस्ते प्रदान.



**११ मे**

**१९९९ :** टेनिसची सम्राज्ञी स्टेफी ग्राफने जर्मन खुल्या टेनिस स्पर्धेत आपल्या कारकिर्दीतील एक हजारावा सामना खेळण्याचा विक्रम केला.



**१२ मे**

**२००५ :** जमिनीवरून जमिनीवर मारा करणाऱ्या मध्यम पल्ल्याच्या ‘पृथ्वी’ क्षेपणास्त्राची चंडीपूर येथे यशस्वी चाचणी.

**बोधकथा**

प्रशांत सरुडकर



## शाखामृगचा वेडेपणा

**विरोदीप नावाचा राजा संताळ प्रदेशात राज्य करत होता. त्याचे राज्य मोठे होते. एके दिवशी आपल्या उपवनातून फिरत असताना राजाला एका झाडाखाली एक माकडाचे पिल्लू दिसले. वनाच्या चौकीदाराने सांगितले ते पिल्लू आईविना आहे.** राजाला त्याची दया आली व त्याने त्याला जवळ घेतले. राजाचा त्या माकडाच्या पिल्लावर लोभ जडला. त्याने त्या पिल्लाला राजवाड्यात आणले आणि तेथेच त्याची राहण्याची सोय केली. त्याने आवडीने त्याचे नाव शाखामृग ठेवले. पुढे शाखामृग मोठा झाला. दिवसभर शाखामृग राजा बरोबर असायचा. राजा त्याला गोड फळे खायला द्यायचा. त्याच्यासाठी राजाने छान कपडे शिवून घेतले.

एकदा राजा जवळच्याच एका उद्यानात फिरायला गेला. सर्व राजपरिवार त्याच्यासोबत होता. त्या तलावाच्या काठी सुंदर अशा लता-वेलींच्या मंडपात राजासाठी भोजनाची व्यवस्था करण्यात आली होती. सर्व राजपरिवाराने भोजनाचा आस्वाद घेतला. दिवसभर बागेमध्ये फिरल्यामुळे राजा थकला व आपल्या सेवकाला म्हणाला, ‘मी थोडी विश्रांती घेतो’ आणि मग त्या बागेमधील राजमहालात राजा विश्रांतीसाठी गेला. राजाबरोबर शाखामृगही होता. राजा विश्रांतीसाठी पलंगावर झोपला. दिवसभर दमल्यामुळे त्याला गाढ झोप लागली. शाखामृग तिथेच होता. एक माशी राजाच्या नाकावर बसलेली त्याला दिसली.

राजाची झोपमोड होईल यामुळे त्याने हातानेच माशीला उडवण्याचा प्रयत्न केला. माशी उडाली व पुन्हा थोड्या वेळाने राजाच्या नाकावर बसली. चार-पाच वेळेला शाखामृगने तिला दूर करण्याचा प्रयत्न केला, पण माशी पुन्हा पुन्हा राजाच्या नाकावर येऊन बसे. याचा शाखामृगला अतिशय राग आला. तो मनातल्या मनात म्हणाला, “थांब, आता मी तुझा जीवच घेतो.” राजाने शेजारीच आपली तलवार काढून ठेवली होती. शाखामृगने ती तलवार उचलली. माशी राजाच्या नाकावर बसलेली होती. त्याने तलवारीने जोरात वार केला. माशी उडून गेली, पण राजाच्या नाकाला मोठी इजा झाली. राजा खडबडून जागा झाला व एकंदर प्रकार त्याच्या लक्षात आला.

**तात्पर्य : बऱ्याच वेळा आपल्याविषयी स्नेह, प्रेम असणाऱ्या व्यक्तींच्या मूर्खपणामुळेही आपण संकटात येतो. त्यामुळे काळजी घ्यावी.**

**गुड मॅनर्स**

## शुद्धलेखनाची सवय

**दोस्तांनो, केवळ लिखाण करणं पुरेसं ठरत नाही. संगणक, मोबाईल, लॅपटॉपच्या काळात हाताने लिहिण्याची सवय असणं कौतुकास्पद असून, ती जपून ठेवायलाच हवी. मात्र, मित्र-मैत्रिणींनो केवळ लिहिणं पुरेसं नाही. तुम्ही जेही लिहीत आहात, ते कसं लिहिता? याला खूप महत्त्व आहे. कारण, वाचणारा सर्वांत आधी बघतो, ते अक्षर आणि त्यानंतर पाहतो, ते शुद्धलेखन!**



शाळेत आपल्याला मराठीचे शुद्धलेखनाचे नियमही शिकवले जातात. मात्र, ते किती विद्यार्थी मनापासून शिकतात? त्याचा सराव करतात? त्या नियमांची उजळणी करतात? हे पाहणं महत्त्वाचं आहे. शालेय वयातच शुद्धलेखन पक्क झालं, तर ते पुढेही उपयोगात येतं. लेखन, संपादन, अनुवाद, शब्दांकन अशा प्रकारची विविध कामे करण्यासाठी शुद्धलेखन असणं फार आवश्यक ठरतं.

‘हस्ताक्षर हाच खरा दागिना’ असा सुविचार तुम्ही अनेकदा वाचला, ऐकला असेल. मात्र, केवळ हस्ताक्षर असून उपयोगी नाही. जर अक्षर सुंदर असेल आणि शुद्धलेखनही असेल, तर त्या व्यक्तीचं कौतुक सगळीकडे होतं. सर्व जण त्याच्या हुशारीचं कौतुक करतात. त्याला गुणही अधिक मिळतात. कारण त्याने लिहिलेले पेपर तपासताना कोणताही त्रास शिक्षकांना होत नाही. अगदी सहजपणे त्यांना अक्षर कळतं. त्यामुळे या सुट्टीत रोजचे एक छोटे काम समजून १० ओळी पुस्तकातून पाहून जशाच्या तशा लिहिण्याचा प्रयत्न करा आणि शुद्धलेखनाचे नियम अधिक पक्के करा!

**अवकाश**

सदानंद होशिंग

## ग्रहविचार

**दोस्तांनो, आज आपण आपल्या नवग्रहात समाविष्ट नसणाऱ्या ग्रहांचा विचार करणार आहोत. यातील पहिला ग्रह आहे युरेनस. या ग्रहाचा शोध सर विल्यम हर्षल यांनी १३ मार्च १७८१ रोजी लावला. त्याच्या शोधकर्त्याच्या नावावरून त्याला ‘हर्षल ग्रह’ असेही म्हणतात.**

हा ग्रह सूर्यमालेतील सर्वांत थंड ग्रह आहे. हा वायू आणि अनेक प्रकारच्या बर्फांनी बनलेला आहे. त्याच्या वातावरणात हायड्रोजन, हेलियम, मिथेन आणि ॲसिटिलीनचा सामावेश आहे. यातील प्रमुख घटक हायड्रोजन आहे. याच्या अंतर्भागात ऑक्सिजन, कार्बन आणि नायट्रोजन यांची संयुगे आणि



खडकाळ पदार्थ आहेत. या ग्रहाचा आकार गोल आहे. वातावरणातील मिथेन वायूमुळे याचा रंग निळा-हिरवा दिसतो.

युरेनस या ग्रहाला २७ उपग्रह किंवा चंद्र आहेत. त्यातील मिरांडा, एरियल, उंब्रिएल, टायटानिया आणि ओबेरॉन हे पाच प्रमुख उपग्रह आहेत. युरेनस हा आकाराच्या तुलनेत सर्व ग्रहांमध्ये तिसरा तर वस्तुमानाच्या तुलनेत चौथा ग्रह आहे. या ग्रहाभोवतीदेखील कड्या आहेत. त्यांची संख्या तेरापर्यंत आहे. या कड्या गडद अशा कणांनी बनलेल्या आहेत. यातील सहा कड्या तेजस्वी आहेत.

युरेनसला सूर्याभोवती एक प्रदक्षिणा पूर्ण करण्यास ८४ वर्षांचा कालावधी लागतो. स्वतःभोवती एक प्रदक्षिणा पूर्ण करण्यास त्याला सतरा तासांपेक्षा थोडा जास्त कालावधी लागतो. तो आपल्या अक्षावर ८३ अंशाने झुकलेला आहे. हा ग्रह पूर्वेकडून पश्चिमेकडे परिभ्रमण करतो. या ग्रहाला मराठी आणि हिंदीत ‘अरुण’ असे म्हटले जाते. पुढच्या भागात आपण नेपच्यून या ग्रहाविषयी जाणून घेऊया.

## सेतुबंध सर्वांगासन

**योग जीवन**

मनाली देव

**हे शयन स्थितीमधील आसन आहे. सर्वांगासनचा व सेतुबंधासन एकचा व्यवस्थित सराव झाल्यानंतर या आसनाचा सराव सुरू करावा.**

### असे करावे आसन

प्रथम पाठीवर झोपावे. प्रथम सर्वांगासनच्या स्थितीमध्ये जावे. त्यानंतर हळूहळू एक-एक पाय जमिनीच्या दिशेला घ्यावा. पाय खाली घेताना झटका बसणार नाही याची काळजी घ्यावी. पाय खाली घेताना सर्वांगासनातील हाताची पकड थोडी बदलावी म्हणजेच हाताचा अंगठा पाठीकडे व चार बोटे पोटाच्या दिशेला या प्रमाणे कमरेला किंवा पाठीला आधार द्यावा. दोन्ही तळपाय जमिनीला टेकवायचा प्रयत्न करावा. डोक्याच्या मागची बाजू, खांदे व कोपरे जमिनीला टेकलेले असावेत. छायाचित्रात दाखवल्याप्रमाणे आसनस्थिती घेण्याचा प्रयत्न करावा. हे आसन करताना हनुवटी छातीच्या दिशेला चिकटलेली असावी. जेवढा वेळ आसनस्थितीमध्ये स्थिर राहणे शक्य आहे, तेवढा वेळ स्थिर राहावे. श्वसन संथ सुरू ठेवावे. आसन सोडताना हळूहळू उलट क्रमाने सोडावे किंवा हाताचा आधार काढून दोन्ही हाताचे तळवे खाली जमिनीवर टेकवावे व पाय गुडघ्यात वाकवून हळूहळू कंबर व पाठ जमिनीला टेकवावी.



### लाभ

- या स्थितीत छातीचे, पोटाचे व मांडीचे स्नायू ताणले जातात. ज्यांना थायरॉइडचा, अस्थमाचा त्रास आहे, पचनाशी संबंधित तक्रारी, कंबरदुखी, पाठदुखी आहे, त्यांनी या आसनाचा सराव नियमित करावा.

**काळजी :**

- मानेचे, पाठीचे दुखणे, व्हर्टिगो असलेल्यांनी योग्य मार्गदर्शनाखाली या आसनाचा सराव करावा.

## विठू विठू विठोबा

**वाचू आनंदे**

प्राण्यापक्ष्यांच्या जगाचं आपल्याला लहान वयापासून आकर्षण वाटतं. तुम्ही तुमच्या आजूबाजूला असलेल्या प्राण्यांशी गप्पा मारता का? कुत्र्याशी, मांजराशी, खिडकीतून दिसणाऱ्या झाडाच्या फांदीवर बसणाऱ्या कावळा, चिमणी आणि पोपटाशी?... त्यांना आपली भाषा कितपत समजते, हे सांगणं कठीण आहे. पण आपल्याला मात्र यात खूप मजा येते. हे करताना खूप नवीन कल्पक गोष्टीही सुचतात बरं का! अशाच ८ गोष्टी आहेत ‘विठू विठू विठोबा’मध्ये. हे पुस्तक रेणू दांडेकर यांनी लिहिले आहे. या गोष्टी अगदी साध्या आहेत आणि मराठी फारसे न वाचणाऱ्या मुलांना किंवा लहान मुलांना त्या सहज कळतील. हे पुस्तक वाचण्यामागचा आपला हेतू हा, की रोज आपल्या आजूबाजूला घडणारे प्रसंगसुद्धा गोष्टीरूपात कसे लिहिता येतात, याची ओळख त्यातून होते. चांगल्या-वाईट, लबाड-स्वार्थी अशा सर्व स्वभावांची माणसं आपण पहात असतो. हे स्वभाव प्राण्यापक्ष्यांना देऊन त्यांना घेऊन गोष्टी तयार करता येतात. उन्हाळी सुट्ट्यांच्या दिवसांत आपल्यामागे अभ्यासाचा लकडा जवळजवळ नसतो. या काळात आपण आपली कल्पकता छान छान गोष्टी रचण्यात कामी आणू शकतो. त्याची झलक या पुस्तकातून मिळेल.



८) ‘विठू विठू विठोबा’ हे पुस्तक कोणी लिहिले आहे?

२) झाडे पर्यावरणाचा समतोल राखतात.

कार्टूनची सफर

अरविंद रेणापूरकर

# 'नाइन्टीज किड्स'च्या आवडत्या पॉवरपफ गर्ल्स



**'शुगर, स्पाइस आणि एव्हरीथिंग नाइस!' ही ओळ ऐकल्यावर नव्वदच्या दशकात वाढलेल्या मुलामुलींच्या (म्हणजे नाइन्टीज् किड्सच्या!) डोळ्यांसमोर येतात तीन छोट्या, पण अतिशय शक्तिशाली मुली- 'ब्लॉसम', 'बबल्स' आणि 'बटरकप'. १९९० आणि २००० च्या दशकातल्या 'कार्टून नेटवर्क'वरच्या सर्वांत लोकप्रियमध्ये 'द पॉवरपफ गर्ल्स' या मालिकेचे नाव घ्यायलाच हवे. ही अमेरिकन ॲनिमेटेड कार्टून मालिका क्रेग मॅक्रॅकेन यांनी साकारली. 'कार्टून नेटवर्क'वर १९९८ ते २००५ दरम्यान ती प्रसारित झाली आणि जगभरातील लहान मुलांना ती खूप आवडली.**

## कशा आहेत 'पॉवरपफ गर्ल्स'?

'ब्लॉसम' ही या तिघींच्या गटाची नेता आहे. ती हुशार तर आहेच, पण गोड बोलणारी, चांगल्या प्रकारे योजना आखणारी आणि जबाबदारीने काम पार पाडणारी आहे. गुलाबी रंग ही तिची ओळख आहे. 'बबल्स' खूप लोभस आणि प्रेमळ आहे. तिला प्राण्यांशी संवाद साधता येतो. निळा रंग ही तिची ओळख आहे. तिसरी आणि 'रफ ॲण्ड टफ' गर्ल आहे 'बटरकप'. ती अतिशय धाडसी आणि निष्ठावान आहे. आपली बाजू बरोबर असल्याची खात्री असेल, तर ती भांडायलासुद्धा पुढेमागे बघत नाही. हिरवा रंग ही तिची ओळख. या तिघींच्या जन्माची दाखवलेली कथा रंजक आहे. टाउन्सविल या शहरात प्रोफेसर यूटोनियम एक प्रयोग करत असतात. साखर, मसाले आणि जगातील सर्व चांगल्या गोष्टी वापरून काही तयार करता येई का, हे ते पाहत असतात. तेव्हा त्यात एक रासायनिक पदार्थ पडतो आणि सुपरपॉवर्स असलेल्या तीन मुलींचा त्यातून जन्म होतो. या मुली हवेत तरंगतात आणि सुपरमॅनसारख्या उंच उडतातसुद्धा! शहरात लोकांना त्रास देणाऱ्या गुंडांशी आणि चोरांशी त्या दोन हात करतात आणि त्यांना पकडून देतात. आहे ना मजा!

## नुसत्याच गोंडस नाहीत...

बहुतेक वेळेला चित्रपटांमध्ये आणि अगदी कार्टूनमध्येसुद्धा खलनायकांशी सुपरहीरोच- म्हणजे पुरूषच लढताना दाखवतात. पण पॉवरपफ गर्ल्स या मालिकेतील मुख्य खलनायक 'मोजो जोजो'शी, तसेच 'हिम' या भीतिदायक राक्षसाशी नियमितपणे लढतात. शिवाय यात खलनायकांची 'गँग्रीन गँग', 'अमीबा बॉईज'सुद्धा आहेत. त्यांचाही त्या सामना करतात. त्या शाळेतही जातात. या मालिकेच्या प्रत्येक भागात त्यांच्या शहरावर किंवा तिथल्या लोकांवर वेगळे संकट येत असते आणि त्याविषयी समजताच गर्ल्स हातातील काम सोडून लगेच त्या दिशेने धावतात (खरे तर उडतात!). ब्लॉसम, बबल्स आणि बटरकप फक्त गोंडस नाहीयेत. त्या बुद्धिमान आणि धाडसी आहेत. शिवाय त्यांचे प्रोफेसर युटोनियम यांच्यावर वडिलांसारखे प्रेम आहे. एकमेकींशी या गर्ल्सची घट्ट मैत्री आहे आणि त्या एकमेकींची साथ कधीच सोडत नाहीत. मुलींनी मोठी स्वप्न बघावीत आणि त्या स्वप्नांसाठी उभे रहावे, मुलींनी एकमेकींना मदत करावी, हा अप्रत्यक्ष संदेश या गर्ल्स देतात आणि त्यामुळेही त्या जास्त लोकप्रिय झाल्या.



## छान कथानके!

**'पॉवरपफ गर्ल्स' कार्टूनवर आधारित खेळणी, सिनेमे, कॉमिक्स आणि रीबूट मालिका तयार झाली. २०१६ मध्ये त्याचा नवीन ॲनिमेटेड भागही प्रदर्शित झाला. 'पॉवरपफ गर्ल्स'मधील कथानकांमध्ये लहान मुलांना आकर्षक वाटतील अशा गोष्टी आहेत. त्यातले एक कथानक पाहू...**

एकदा टाउन्सविल शहरात शांतता असताना अचानक शहरातील सर्व खेळणी, सायकली, मिठाई वगैरे वस्तू गायब व्हायला लागतात. लहान मुले रडू लागतात, दुकाने बंद होतात आणि एकच गोंधळ उडतो. शहराचे 'मेयर'- म्हणजे महापौर घाबरून जाऊन पॉवरपफ गर्ल्सना फोन करतात. लगेच ब्लॉसम, बबल्स आणि बटरकप शहरभर तपास करतात. अखेर त्यांना कुणीतरी झाडांवर टांगून ठेवलेली खेळणी, गॅजेट्स, मिठाई दिसते. शोध घेत घेत गर्ल्स पोहोचतात मोजो जोजोच्या अड्ड्यावर. मोजो जोजो एक चिम्पान्झीरूपी खलनायक आहे. **तो एक विशाल रोबो तयार करत असतो. त्या रोबोमध्ये मुलांची खेळणी, मिठाई आणि ऊर्जा स्रोत वापरून त्याला टाउन्सविल शहरच ताब्यात घ्यायचे असते. गर्ल्स रोबोला निष्प्रभ करतात आणि मोजो जोजोची योजना फसून तो पुन्हा जेलमध्ये जातो!**

ज्ञान-विज्ञान

डॉ. तन्मयी रानडे

# आवाज की दुनिया...

**मित्र मैत्रिणींनो, "तू इतका ओरडून का बोलतो आहेस?" किंवा "ह्या बाई किती हळू बोलतात! काहीही ऐकू येत नाही.." किंवा "काय कुजबुज चालली आहे तिकडे कोपऱ्यात?" असे संवाद आपण रोज ऐकत असतो. कोणताही लहान-मोठा आवाज आपण ऐकू शकतो, कारण आपले कान ध्वनी व शब्द ऐकायला तयार झालेले आहेत. वेगवेगळे आवाज- पक्ष्यांचे ओरडणे, कुकरची शिट्टी किंवा मोबाईलची रिंग आपण ऐकत असतो. ध्वनीच्या विज्ञानाला ध्वनिविज्ञान किंवा Acoustics असे म्हणतात. आज जाणून घेऊया त्याबद्दल.**

**आवाजाची तीव्रता :** ध्वनीची तीव्रता किंवा जोर, डेसिबल (dB) वापरून मोजला जातो. डेसिबल हे एक एकक असून, ते 'बेल' चा दशांश भाग आहे. त्यामुळे ध्वनीची तीव्रता मोजली जाते. डेसिबल स्केल 'लॉगरिदमिक' आहे, म्हणजे १० डीबी वाढल्याने ध्वनीतीव्रतेत दहापट वाढ होते. उदाहरणार्थ, ६० डीबीवरील ध्वनी हा ५० डीबीवरील ध्वनीपेक्षा १० पट जास्त आणि ४० डीबीवरील ध्वनीपेक्षा १०० पट जास्त असतो.

## आवाजाची पट्टी (पिच)

आपण सामान्यतः high pitch voice (उदा. पक्ष्यांचे ओरडणे, कर्कश शिट्टी) किंवा low pitch voice (उदा. एखादा मंजुळ आवाज, पेटी-बासरीचे स्वर) अशा दोन प्रकारचे आवाज ऐकतो. आवाजाची पट्टी ही हर्ट्झ (Hz) मध्ये मोजली जाते. यालाच ध्वनीची वारंवारता असेही म्हणतात. आवाज निर्माण झाल्यावर त्यातून तयार होणाऱ्या लाटेच्या उंचीवरून (amplitude) त्याची तीव्रता ठरते.

## परावर्तन आणि शोषण

ध्वनी परावर्तित होऊ शकतो, प्रतिध्वनी निर्माण करू शकतो किंवा एखाद्या पदार्थांद्वारे शोषलाही जाऊ शकतो. त्यामुळे ध्वनीची तीव्रता कमी होते.



## शरीरात ध्वनी कसा निर्माण होतो?

आपल्या घशात स्वरयंत्र (larynx किंवा vocal chords) असते. फुफ्फुसातील हवा स्वरयंत्रांना कंपन करण्यास भाग पाडते. त्यामुळे आपल्या स्वरयंत्रात ध्वनी निर्माण होतो. त्यानंतर तोंड आणि घशाच्या आकारानुसार ध्वनिलहरींमध्ये बदल होऊन वेगवेगळे आवाज निर्माण होतात.

## लक्षात ठेवा...

**२०** **डेसिबल (डीबी) :** एखादे शांत कार्यालय, पानांची सळसळ.

**६०** **डेसिबल (डीबी) :** सामान्य आवाजात होणारे संभाषण.

**८५** **डेसिबल :** रहदारीचे आवाज.

**१२०** **(डीबी) :** थोड्या अंतरावरून उडणारे विमान. यामुळे कानाला त्रास होतो.

**१४०** **(डीबी) :** जेट विमान जवळून उड्डाण करते, त्या वेळी होणारा मोठा आवाज. कानाला धोका.

## महत्त्वाचे...


मित्र-मैत्रिणींनो, सण, उत्सव, मिरवणुका, लग्नसमारंभ यांमध्ये बऱ्याचदा मोठ्या प्रमाणावर डी. जे.चा वापर केला जातो. त्या आवाजाची पातळी खूप जास्त असल्याने मोठ्या प्रमाणावर ध्वनिप्रदूषण होते. लहान मुले, ज्येष्ठ नागरिक, रुग्ण यांना त्रास होतो. त्यामुळे तुमच्या भागात असा प्रकार आढळल्यास तुम्ही त्यात सहभागी होणे टाळा. गरज पडल्यास मोठ्यांची मदत घेऊन असे आवाज थांबवा. सुट्टीत तुम्ही डोंगर-दऱ्यांमध्ये फिरायला गेलात, तर एखाद्या दरीमध्ये मोठ्याने ओरडून तुमच्या आवाजचा प्रतिध्वनी (इको) येतो का? हे पाहा!


## आवाज की लाट?


ध्वनी हा एखाद्या लाटेसारखा आहे. कोणत्याही माध्यमातील कण हे एखादी लाट ज्या दिशेने प्रवास करते त्याच दिशेने पुढे-मागे होतात म्हणजेच त्याच पद्धतीने त्यातून कंपने निर्माण होतात. त्यामुळे ध्वनीच्या प्रवासासाठी माध्यमाची आवश्यकता असते. जसे की, हवा, पाणी इत्यादी. त्यामुळेच पृथ्वी बाहेरच्या निर्वात पोकळीत ध्वनीचा प्रवास होत नाही. ध्वनी घन पदार्थांमध्ये सर्वांत वेगाने प्रवास करतो. त्यानंतर द्रव पदार्थात आणि मग वायू पदार्थात सर्वांत हळू गतीने प्रवास करतो.

? ९) 'द पॉवरपफ गर्ल्स' ही मालिका कोणी साकारली?

✔ ५) गारफिल्ड केशरी रंगाचा पर्शियन बोका आहे.










खालील चित्रातील ८ फरक ओळखा.






योग्य मार्ग दाखवा.






हस्तकला
मंदार वैद्य

# फुलांचा बहर

**दोस्तांनो, सध्याच्या असह्य उकाड्याच्या काळात आपण सर्व जण पावसाची आतुरतेने वाट बघतो आहे. थोड्याच दिवसांत पाऊस सुरू होईल आणि सारी सृष्टी हिरवाईने आणि रंगीबेरंगी फुलांनी बहरून जाईल. तूर्तास ओरिगामीच्या माध्यमातून सृष्टीमधील बहर तुमच्या हातात आणि मनातदेखील अलगदपणे येईल. तुम्हाला व तुमच्या सोबत ओरिगामी पाहणाऱ्या, करणाऱ्या प्रत्येकाला भरपूर आनंद देईल. चला तर मग, आकर्षक; पण सोपे फूल बनवूया.**




### कृती १




हातातील चौरस कागदाची कर्णरिषेवर घडी घाला व उलगडा. इतर दोन टोके जुळवून दुसऱ्या कर्णरिषेवर घडी घाला व उलगडा. कागद पलटून घ्या.

### कृती २




चौरसाची खालील बाजू वरील बाजूला जुळवून घडी घाला व उलगडा. कागद पलटून घ्या.

### कृती ३




तुटक रेषेने दर्शवलेली घडी कृती क्रमांक चार मधील आकृती बघून आधी समजून घ्या. बाजूची दोन टोके आतमध्ये घडी घालून खालील निळ्या बाणाजवळ आणा त्याच वेळी वरील कागदाची बाजू निळ्या बाणाजवळ आणा.

### कृती ४




त्रिकोणाच्या खालील प्रत्येक बाजूस दोन टोके आहेत. उजव्या बाजूचे वरील टोक उचला व त्रिकोणाच्या वरच्या कोनाजवळ आणून तुटकरेषेच्या आधारे घडी घाला डाव्या बाजूचेसुद्धा वरील टोक उचला व वरच्या कोनाजवळ घडी घाला. पाठीमागील टोकांचीसुद्धा याच पद्धतीने घडी घाला.

### कृती ५




उभ्या तुटक रेषेने दर्शविल्याप्रमाणे घडी घालून पुढील दोन टोके एकत्र जुळवा. त्याच पद्धतीने पाठीमागील दोन टोकेदेखील घडी घालून एकत्र जुळवा.

### कृती ६




तुटक रेषेचा आधार घेऊन डाव्या बाजूचे वरील टोक व उजव्या बाजूचे वरील टोक यांची घडी घाला.

### कृती ७



इथे दोन उभे कप्पे तयार झाले आहेत. उजव्या बाजूचा कप्पा डाव्या बाजूच्या कप्प्यामध्ये आत सरकवा व घडी घाला.

### कृती ८



वरीलप्रमाणे पाठीमागच्या दोन टोकांचीदेखील कप्प्यामध्ये सरकवून घडी घाला.

### कृती ९




तुटकरेषेने दर्शवल्याप्रमाणे खालील त्रिकोण वरती उचलून घडी घाला व उलगडा.

### कृती १०



बाणाने दाखवलेले टोक हळूच दाबून वर न्या व सपाट करा. इथे थोडी फुंकर मारली तरी चालेल.

### कृती ११



अशी पिरॅमिडसारखी रचना तुमच्या हातामध्ये तयार होईल.

### कृती १२



पिरॅमिडच्या वरील टोकाजवळ असलेली कागदाची चार टोके बारकाईने पाहा आणि अलगद थोडी बाहेर ओढा. हे छानसे फूल तुमच्या हातामध्ये उमलून तयार होईल. या फुलाचे देठ बनवण्यासाठी २१ फेब्रुवारी रोजी प्रसिद्ध झालेले ओरिगामीचे 'हस्तकला' हे सदर पुन्हा एकदा पाहा. त्यामध्ये देठ बनवण्याची कृती दिली आहे. देठ बनवण्यासाठी तुम्ही हातातील कागदाच्या घड्या घालून थोडा वेगळा प्रयत्न करण्यासदेखील हरकत नाही.

स्पर्धेत उतरताना
जयवंत बोरसे

# शिष्यवृत्ती परीक्षेबद्दल...



## पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा

### पात्रतेचे निकष

- नव्या धोरणानुसार उत्तीर्ण आणि अनुत्तीर्ण याऐवजी शिष्यवृत्ती मिळण्यास पात्र (शिष्यवृत्ती अर्हताधारक नव्हे) आणि अपात्र अशा स्वरूपात निकाल जाहीर केला जातो.
- पात्र ठरण्यासाठी दोन्ही पेपरमध्ये ४०% किंवा त्यापेक्षा जास्त गुण आवश्यक असतात.

### शिष्यवृत्तीधारक विद्यार्थी यादी

- पात्र विद्यार्थ्यांमधून ग्रामीण व शहरी विभागनिहाय (स्वतंत्रपणे) गुणानुक्रमे विद्यार्थ्यांची गुणवत्ता यादी तयार केली जाते.
- मंजूर शिष्यवृत्तीसंचानुसार गुणानुक्रमे विद्यार्थ्यांची राज्यस्तरीय व जिल्हास्तरीय गुणवत्ता यादी तयार होते.
- राज्य बोर्डाच्या (S.S.C.) सर्व गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांना विहित शिष्यवृत्ती जाहीर होते व त्या-त्या वर्षी अदा केली जाते.
- केंद्रीय बोर्ड (C.B.S.C.) आणि आंतरराष्ट्रीय बोर्डाचा (I.C.S.C.) अभ्यासक्रम असलेल्या शाळांतील ५० विद्यार्थ्यांची स्वतंत्र गुणवत्ता यादी (फक्त राज्यस्तरीय-जिल्हास्तरीय नव्हे) तयार केली जाते. या यादीतील विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र दिले जाते, परंतु शिष्यवृत्ती अदा केली जात नाही.

### शिष्यवृत्ती प्रदान करायचे निकष

पात्र विद्यार्थ्यांमधून शासनमान्य मंजूर संचाइतके विद्यार्थी शिष्यवृत्तीकरिता अर्हताधारक म्हणून निवडण्यात येतात. शिष्यवृत्तीचे संच मर्यादित असल्याने एकूण शेकडा गुणांइतके कटऑफ शेकडा गुण मिळालेले सर्व विद्यार्थी शिष्यवृत्तीधारक होतीलच असे नाही. अशा वेळी अर्हताधारक विद्यार्थी निश्चित करताना खालील निकष लक्षात घेतले जातात.

१ एकुणात समान गुण, परंतु तृतीय भाषा व बुद्धिमत्ता चाचणीमध्ये (पेपर क्र.२) अधिकचे शेकडा गुण मिळवणारा परीक्षार्थी.

२ एकुणात समान शेकडा गुण आणि पेपर क्र. २ मध्येही समान शेकडा गुण मिळाले असल्यास वयाने मोठा (ज्याचे वय जास्त आहे) असलेल्या परीक्षार्थ्यास प्राधान्य.

### ग्रामीण/शहरी निकष

गामपंचायतीच्या प्रशासकीय नियंत्रणाखाली किंवा ग्रामपंचायत क्षेत्र अस्तित्वात असलेल्या गावातील शाळांची गणना 'ग्रामीण', तर त्याशिवाय उर्वरित सर्व ठिकाणच्या शाळांची गणना 'शहरी' होते.

### शिष्यवृत्ती प्रदानाच्या अटी

- शिष्यवृत्ती अर्हताधारक विद्यार्थ्याने लगेचच्या वर्षी पुढच्या वर्गात (इ. ६ वी) प्रवेश घेणे अनिवार्य आहे.
- इयत्ता पाचवी पास झाल्यानंतरच्या वर्षापासून तीन वर्षे शिष्यवृत्ती चालू असेल. त्यासाठी नियमित उपस्थिती, चांगले वर्तन व समाधानकारक प्रगती आवश्यक आहे. वरील दोन्ही अटींची पूर्तता होत नसेल, तर शिष्यवृत्ती अर्हताधारक विद्यार्थ्याची शिष्यवृत्ती रद्द केली जाते.
- शिष्यवृत्ती मिळवण्यासाठी संबंधित मुख्याध्यापकांमार्फत ऑनलाइन प्रस्ताव सादर करणे अनिवार्य आहे.

### अधिक माहितीसाठी

**वेबसाइट**
www.mscepune.in आणि
www.puppss.mscescholarshipexam.in

**ई-मेल**
mscescholarship@gmail.com,
puppsshelpdesk@gmail.com

**हेल्पलाइन**
9240275800

**दूरध्वनी**
020-29709617

**कार्यालयाचा पत्ता**
**मा. आयुक्त,**
**महाराष्ट्र राज्य परीक्षा परीषद,**
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ कार्यालय इमारत, (दुसरा व चौथा मजला) सर्व्हे नं. ८३२-ए, आघारकर रिसर्च इन्स्टिट्यूटच्या मागे, भांबुर्डा, शिवाजीनगर, पुणे-४११००४

• Registered • Date of Publication : शुक्रवार, ९ मे २०२५ • Posted at BPC Vishrambagwada, CSO Pune Daily. • आर.एन.आय. MAHMAR-१५५७/५७.



# छोटा पॅकेट, बडा धमाका



## वैभव सूर्यवंशी

जन्म : २७ मार्च २०११, ताजपूर, बिहार

वयाच्या १४ व्या वर्षी 'आयपीएल'द्वारा आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये पदार्पण.

१९ एप्रिल २०२५ ला लखनौविरुद्ध खेळून आयपीएलमध्ये पदार्पण.

पहिल्याच सामन्यात पहिल्याच चेंडूवर मारला होता षटकार.

आयपीएल मधील सर्वांत युवा खेळाडू ठरण्याचा विक्रम.

दोस्तांनो, सध्या सुरू असलेल्या इंडियन प्रीमियर लीग-२०२५ (आयपीएल) मध्ये अवघ्या ३५ धावांमध्ये शतक ठोकणाऱ्या वैभव सूर्यवंशी या १४ वर्षांच्या खेळाडूने केलेली अभूतपूर्व कामगिरी तुम्ही सर्वांनी पाहिली असेलच. त्याने वयाच्या १४ व्या वर्षी राजस्थान रॉयल्स या संघाकडून गुजरात टायटन्सविरुद्ध खेळताना केवळ ३५ चेंडूंत शतकी खेळी केली. एवढ्या कमी वयात आंतरराष्ट्रीय स्तरावरील सामन्यात खेळून त्याने सर्वांचे लक्ष आपल्याकडे वेधून घेतले आहे. जाणून घेऊया या 'छोटा पॅकेट, बडा धमाका'विषयी...!

### टीम इंडियात जाणार?

बिहारकडून खेळणाऱ्या वैभवने आजनर ५ प्रथम श्रेणी (एफ.सी.) आणि ६ 'लिस्ट ए' प्रकारचे सामने खेळले आहेत. कमी वय आणि आक्रमक फलंदाजीमुळे तो प्रसिद्धीच्या झोतात आला. वैभव सूर्यवंशी मूळचा बिहारचा असला, तरी सध्या त्याला बंगाल क्रिकेट बोर्डाकडून खेळण्याची संधी मिळाली आहे. वैभव जर बंगालमधून खेळला, तर भारतीय निवड समिती त्याच्यावर बारकाईने लक्ष ठेवेल, असे बंगाल क्रिकेट असोसिएशनने म्हटले आहे. यामुळे त्याचा टीम इंडियापर्यंत पोहोचण्याचा मार्ग अधिक सुकर होऊ शकतो, असं बोललं जात आहे. यापूर्वी बिहार सोडून ईशान किशनदेखील झारखंडकडून खेळला आहे. मुकेश कुमार आणि आकाशदीप यांनीही बिहार सोडले आणि बंगालकडून खेळले. सबा करीमही बंगालमधून क्रिकेट खेळली आणि ती टीम इंडियापर्यंत पोहोचली.

### उल्लेखनीय...

टी-२० क्रिकेटमध्ये कमी सर्वांत वयात शतक ठोकणारा खेळाडू.

आयपीएलमधील दुसरा सर्वांत जलद शतक करणारा आणि पहिला भारतीय फलंदाज होण्याचा विक्रम.

वयाच्या १२ व्या वर्षी बिहारकडून रणजीसाठी खेळण्याची कामगिरी.

वयाच्या १३ व्या वर्षी १९ वर्षांखालील भारतीय संघात पटकावले स्थान.

| टी-२० | |
|---|---|
| सामने | : ६ |
| धावा | : १६८ |
| शतक | : १ |
| १०१ | सर्वोच्च धावा |

| आयपीएल | |
|---|---|
| सामने | : ५ |
| धावा | : १५५ |
| शतक | : १ |
| १०१ | सर्वोच्च धावा |

| 'लिस्ट ए' | |
|---|---|
| सामने | : ६ |
| धावा | : १३२ |
| अर्धशतक | : १ |
| ७१ | सर्वोच्च धावा |

| प्रथम श्रेणी (एफ.सी.) | |
|---|---|
| सामने | : ५ |
| धावा | : १०० |
| शतक | : १ |
| ४१ | सर्वोच्च धावा |

आएपीएलमध्ये खेळताना दबाव असतो. वैभवला सध्या काही काळ या खेळाची सवय होऊ द्या आणि त्याचा आनंद घेऊ द्या. तो एक दिवस भारतीय संघाकडून नक्की खेळेल. तो आता वयाच्या कितव्या वर्षी भारतीय संघाकडून खेळतो? हे पाहणे महत्त्वाचे ठरेल. मला असं वाटतं तो सचिन तेंडुलकरचा भारतासाठी सर्वांत कमी वयात खेळण्याचा विक्रम मोडेल. मात्र याबाबत घाई होऊ नये.

**- मायकल वॉन,**
इंग्लडचा माजी कर्णधार